स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

वास्तव २० वर्ष

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

ई पेपर वाचा
http://epaper.beedvastav.com
https://www.beedvastav.com

# साध्या पद्धतीने लग्नं केले तरी मुलं होतात म्हणणाऱ्या इंदुरीकर महाराजांच्या मुलीच्या साखरपुड्यात लाखोंचा खर्च कशासाठी?

इंदुरीकर महाराज तुमच्या मुलीच्या शाही साखरपुड्याच्या खर्चात दहा गरिबांच्या मुली उजवून निघाल्या असत्या!!!

कीर्तनातून लग्नातील अनावश्यक खर्चावर टीका करणारे महाराजाकडून स्वतःच्या मुलीच्या साखरपुड्यावर लाखोंची उधळपट्टी!

तुम्हाला नाव ठेवायचं तर ठेवा पण आपल्या माणसांसाठी ही काळाची गरज आहे," असेही इंदुरीकर महाराज म्हणाले!!

## दुसऱ्यांना अक्कल शिकविणाऱ्या इंदुरीकर महाराजांवर नेटकऱ्यांकडून टिकेची झोड

अहिल्यानगर : प्रतिनिधी
प्रसिद्ध कीर्तनकार निवृत्ती महाराज देशमुख उर्फ इंदुरीकर महाराज यांच्या कन्येच्या नुकत्याच पार पडलेल्या साखरपुड्याच्या सोहळ्यावरून चर्चा सुरु झाली आहे. कीर्तनातून लग्नातील अनावश्यक खर्चावर टीका करणारे महाराज स्वत:च्या मुलीच्या साखरपुड्यावर लाखोंची उधळपट्टी करत असल्याचा गंभीर आरोप मुंबई डबेवाला संघटनेच्या अध्यक्षांनी केला. या सगळ्या वादावर इंदुरीकर महाराज यांनी कार्यक्रमातच स्पष्टीकरण दिलं. मुलीच्या साखरपुड्यात मोठ्या प्रमाणात झालेल्या खर्चामुळे टीका होत असली तरी त्यांनी आलेल्या मान्यवरांचा सत्कार सोहळा टाळला.



### टीका होणार हे माहिती असल्याने कार्यक्रमातच देवून टाकले स्पष्टीकरण

● मात्र इंदुरीकर महाराज यांना अशा प्रकारची टीका होणार हे माहिती असल्याने त्यांनी कार्यक्रमात याबाबत स्पष्टीकरण दिलं. "वीस वर्षे लोकांनी नावं ठेवली तेच सहन करत आलो. पण आता इथून पुढे विशिष्ट व्यक्तीचा सत्कार करायचा नाही असा बदल करायचा ठरवला आहे. करायचा तर सगळ्यांचा नाहीतर एकाचाही नाही. एवढ्या मोठ्या पद्धतीने साखरपुडा हा तुम्हाला दाखवण्यासाठी केला की आपण बदल करू शकतो. बदल करण्याची ताकद आपल्यामध्ये आहे. जेवण महाराष्ट्रीयन पद्धतीने ठेवलं, चायनीज वगैरे आपल्याकडे चालणार नाही. त्याच्यासाठी आठ दिवस वाद केला पण जेवण महाराष्ट्रीयन ठेवलं. जेवण वाढणाऱ्याचा ड्रेस हा वारकऱ्या सारखा ठेवला. सगळ्यांना समान वागणूक. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे खुर्ची नाही. फक्त ज्याला आजार आहे त्यानेच खुर्चीवर बसायचं. वारकरी संप्रदायाने जगाला एकात्मता आणि संघटन कौशल्य शिकवले. कोणाला कमी पाहिलं नाही, कोणाची स्तुती केली नाही, कोणाची निंदा केली नाही, असं स्पष्टीकरण इंदुरीकर महाराजांनी दिलं.

### व्याही भेट हा कार्यक्रम देखील बंद करून टाकला!

● व्याही भेट हा कार्यक्रम देखील बंद करून टाकला आहे. तुम्हाला नाव ठेवायचं तर ठेवा पण आपल्या माणसांसाठी ही काळाची गरज आहे," असेही इंदुरीकर महाराज म्हणाले. मी शेतकऱ्याचा मुलगा आहे आणि लोकांच्या आशीर्वादाने इथपर्यंत पोहोचलो," असं स्पष्टीकरण इंदुरीकर महाराजांनी दिलं.







### लोका सांगे ब्रह्मज्ञान...शाही सोहळ्यातील खर्चावरून इंदुरीकर महाराजांवर तीव्र टीका

● कीर्तनकार इंदुरीकर महाराज यांची कन्या ज्ञानेश्वरीचा साखरपुडा नुकताच संगमनेर येथील 'वसंत लॉन्स' येथे मोठ्या थाटामाटात पार पडला. या सोहळ्याला काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थितीत होते. मात्र शाही सोहळ्यातील खर्चावरून इंदुरीकर महाराजांवर तीव्र टीका सुरू झाली आहे. लोकांना दाखवण्यासाठी कर्ज काढून आपल्या मुला-मुलींचे लग्न मोठ्या थाटात करू नका, लग्न साध्या पद्धतीनं करा, साध्या पद्धतीने लग्न केले तरी मुलं होतात, असा सल्ला इंदुरीकर यांनी आपल्या कीर्तनातून दिला होता. दुसरीकडे, दुसऱ्यांना अक्कल शिकवणारे इंदुरीकर महाराज आपल्या मुलीच्या साखरपुड्यासाठी लाखो रुपयांचा खर्च करतात अशी टीका मुंबई डबेवाला संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर यांनी केली.

## कामे करताना गट तट कधीच पाहिला नाही यापुढेही पाहणार नाही : बदामराव पंडित

➤ गेवराई : प्रतिनिधी
गेल्या 30 वर्षापासून राजकारण आणि समाजकारणात मी कधीही कोणतेही काम करताना गट तट आणि पक्ष पाहिला नाही. आलेला प्रत्येक माणूस मोठ्या अपेक्षेने माझ्याकडे काम घेऊन येतो आणि मीही त्यांची कामे प्रामाणिकपणे करतो. यामुळे सामान्य माणूस आणि माझे एकमेकांशी नाते जुळलेले आहे. ते यापुढेही कायम ठेवण्यासाठी माझ्याकडून प्रयत्न राहतील अशी ग्वाही देऊन येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये एक जीवाने सर्व पदाधिकाऱ्यांनी काम करावे असे आवाहनही भाजपा नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी व्यक्त केली आहे. माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी भारतीय जनता पार्टीत प्रवेश केल्यानंतर गेवराई ● पान २ वर...




## संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या सुरक्षेत वाढ करावी

### भाजप शहराध्यक्ष अशोक लोढा यांची मागणी



➤ बीड : मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या जीवाला धोका असल्याचे माध्यमातून समोर आले असून पोलीस प्रशासनाकडून या प्रकरणात तपास सुरू करण्यात आला आहे. दरम्यान या प्रकरणाची गंभीर दखल पोलीस यंत्रणेने घ्यावी. पोलीस प्रशासनाने तत्काळ सखोल तपास करून जरांगे पाटील यांच्या सुरक्षेत वाढ करावी अशी मागणी भाजप शहराध्यक्ष अशोक लोढा यांनी केली आहे.

याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात अशोक लोढा यांनी म्हटले आहे की, मराठा समाजाच्या न्याय्य आणि हक्कांसाठी अहोरात्र संघर्ष करणारे मनोज जरांगे पाटील हे केवळ आंदोलनाचे नेतृत्व करणारे व्यक्तिमत्त्व नसून ते मराठा समाजाच्या आशास्थान बनले आहेत. त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा धोका निर्माण करण्याचा प्रयत्न म्हणजे समाजाच्या भावनांवर आघात ठरणार आहे. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी जे आंदोलन उभारले, ते राज्यभरातील समाजभावनेला दिशा देणारे ठरले. त्यांच्या संघर्षामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नाला नवे वळण मिळाले. महाराष्ट्राची संस्कृती संवाद, समानता आणि शांततेची आहे. या संस्कृतीला विरोधी दिशा देणाऱ्या आणि समाजात अस्वस्थता निर्माण करणाऱ्या घटना कोणत्याही परिस्थितीत स्वीकारार्ह नाहीत. जर कोणीतरी त्यांच्या जीवाला धोका निर्माण करण्याचा प्रयत्न करत असेल, तर अशा व्यक्तींवर कठोर कारवाई व्हावी, असेही लोढा यांनी म्हंटले आहे

## फसवणूक प्रकरणातील आरोपींना अटकपूर्व जामीन मंजूर

➤ बीड : प्रतिनिधी
शहरातील शिवाजीनगर पोलिस स्टेशन बीड अंतर्गत गुन्हा क्र ३७६/२०२५ या प्रकारणातील आरोपीचा अटकपूर्व जामीन मंजुर करण्यात आला असून आरोपी तर्फे वकिल अँड शेख सद्दाम शेख इस्माईल, अँड आदर्श जाधव यांनी काम पाहिले आहे.



याबाबत घटनेचा वृत्तांत असा की, भारतीय दंड संहितेच्या कलम 34, 420, 447, 448, 465, 468, 471 अंतर्गत दाखल झालेल्या फसवणूक, बनावट कागदपत्र तयार करणे व अतिक्रमण या गंभीर आरोपांच्या प्रकरणात आरोपींना अटकपूर्व जामीन मंजूर करण्यात आला आहे. या प्रकरणात आरोपींवर फसवणुकीच्या माध्यमातून जमीन व्यवहारात ● पान २ वर...

➤ राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार व कर्तव्यदक्ष नगराध्यक्षा सौ. सिताताई बनसोड यांच्या प्रयत्नाला यश

## केज नगरपंचायतच्या माध्यमातून शहराच्या विकासासाठी जिल्हा नियोजन मधून 6 कोटी 30 लक्ष रुपयाचा निधी मंजूर

➤ केज : प्रतिनिधी
केज नगरपंचायतच्या माध्यमातून केज शहराचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी जिल्हा नियोजन अंतर्गत ६ कोटी ३० लक्ष रुपयाचा निधी उपलब्ध कित्येक वर्षापासून केज शहर विकासापासून कोसो दूर होते परंतु गेल्या तीन-चार वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार पक्षाचे जेष्ठ नेते हारुणभाई इनामदार व कर्तव्यदक्ष नगराध्यक्षा सौ. सीताबाई बनसोड यांच्या आथक परिश्रमाने केज शहराचा चेहरा मोहरा बदलताना दिसत आहे. यावेळी आम्ही पाहिलेले स्वप्न साकारताना दिसत असल्याचे ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार यांनी बोलताना आपले मत व्यक्त केले. याचबरोबर केज शहरात विविध विकासकामे गेल्या तीन-चार वर्षात होत आहेत आणि काही कामे प्रगतीपथावर आहेत. यावेळी बोलताना पाण्याचा प्रश्न मोठा गंभीर असतानाही आम्ही संकटाला तोंड देत केज वासियांना पाणीपुरवठा करत आहोत यात पाणीपुरवठ्याची योजना अंतिम टप्प्यात असून या कामासाठी १२९ कोटींची योजना तांत्रिक मान्यता पर्यंत मंजूरी साठी अंतिम टप्प्यात आहे. काही दिवसात हे काम प्रत्यक्षात चालू होईल असे मत हारुणभाई इनामदार यांनी बोलताना स्पष्ट केले. तर केज शहराच्या स्वच्छतेसाठी स्वच्छता ग्रह बांधण्याचा निर्धार करण्यात आला आहे यामुळे स्वच्छ शहर



सुंदर शहर या माध्यमातून झाल्याशिवाय राहणार नाही यामध्ये बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार तसेच आमदार नमिताताई मुदडा खासदार रजनीताई पाटील रमेश रावजी आडसकर यांच्या प्रयत्नामुळे केज शहराला निधी उपलब्ध झाला असे मत व्यक्त करून महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री यांनी आम्हाला जिल्हा नियोजना मधुन निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल दादांचे आभार व्यक्त केले. केज शहरातील विकास कामे ही दलित वस्ती सुधारण्यासह मूलभूत कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली असून शहरात ज्या भागांमध्ये दलित वस्ती आहे अथवा दलित नागरिक हे ज्या भागात राहतात. या निधीमुळे शहराच्या विकासाला एक नवी दिशा मिळाली. मागील तीन ते चार वर्षापासून ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्या प्रयत्नातून केज शहराच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करण्यात आला असून जिल्हा अधिकारी कार्यालयाच्या नगरपरिषद प्रशासन विभागाने एकाच दिवशी तीन प्रमुख योजनेतील कामांना प्रशासकीय मान्यता दिली आहे. सहा कोटी तीस लक्ष रुपयाचा निधी दिल्यामुळे केज शहराच्या विकासासाठी भर पडली असून या ● पान २ वर...

## बाबा देशमाने संपादीत संवाद वार्षिक अंकाचे नवी दिल्लीतील महाराष्ट्र परिचय केंद्रात प्रकाशन

### संचालक हेमराज बागूल यांच्याकडून कौतुक





➤ नवी दिल्ली : प्रतिनिधी
ज्येष्ठ पत्रकार बाबा देशमाने संपादीत संवाद : २०२५ या वार्षिक अंकाचे नवी दिल्ली स्थित महारष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागूल यांच्या हस्ते करण्यात आले. महाराष्ट्र आणि गोवा राज्यात आपल्या सकारात्मक पत्रकारितेच्या माध्यमातून वेगळी ओळख निर्माण करणारे ज्येष्ठ पत्रकार बाबा देशमाने यांनी संवाद : २०२५ या वार्षिक अंकाचे संपादन केले आहे. संवादचे प्रकाशन नवी दिल्ली येथे महाराष्ट्र परिचय केंद्रात संचालक हेमराज बागूल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संपादक बाबा देशमाने, लढा दुष्काळाशी चळवळीचे प्रणेते अँड. राज पाटील, ● पान २ वर...

कव्हर पेजवर अँड. राज पाटील

## कौतुकाची थाप!!



माजलगाव : येथील वैद्यकीय क्षेत्रातील देव माणूस आणि भाजपचे केंद्रीय सदस्य डॉ प्रकाशराव आनंदगवकर यांच्या कडून नगरसेवक विजय शिंदे कौतुकाची थाप मिळाली तो क्षण..!!



http://epaper.beedvastav.com

# भारतीय विद्यार्थी दिन : विचार, पार्श्वभूमी आणि वास्तव

'भारतीय विद्यार्थी दिन' साजरा करण्यामागे एक ऐतिहासिक कारण आहे. ७ नोव्हेंबर १९०० रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर (तेव्हा भिवा या नावाने) साताऱ्यातील प्रतापसिंग हायस्कूल, राजवाडा चौक येथे दाखल झाले. या शाळेच्या रजिस्टरमध्ये क्रमांक १९१४ समोर आजही त्यांची स्वाक्षरी जतन केलेली आहे. ही घटना भारतीय शिक्षण व सामाजिक क्रांतीच्या इतिहासातील एक अमूल्य ठेवा आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ ७ नोव्हेंबर हा दिवस 'विद्यार्थी दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. या दिवशी राज्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालयांमध्ये बाबासाहेबांच्या जीवनकार्यावर आधारित निबंध, वक्तृत्व, काव्यवाचन यांसारख्या उपक्रमांचे आयोजन केले जाते.

७ नोव्हेंबरचा हा दिवस केवळ डॉ. आंबेडकरांच्या शाळा प्रवेशाचा स्मृतीदिन नसून, तो भारतीय इतिहासातील विचारप्रबोधन, समानता, बंधुता आणि शैक्षणिक क्रांतीची सुरूवात दर्शवतो. बाबासाहेबांनी शिक्षणाद्वारे स्वत:चे जीवन उन्नत केले आणि कोट्यवधी वंचितांना प्रकाशाचा मार्ग दाखविला. त्यांच्या संविधानामुळे भारतात स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही मूल्ये दृढपणे रुजली. म्हणूनच हा दिवस 'विद्यार्थी दिन' म्हणून साजरा केला जाणे ही भारतीय समाजासाठी अभिमानाची बाब आहे.

हा दिवस विद्यार्थ्यांच्या समस्या व प्रश्न समाजासमोर मांडण्याचा आणि त्यावर उपाय शोधण्याचा एक महत्त्वपूर्ण दिवस म्हणून साजरा होत आहे.
विद्यार्जन म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान नव्हे; तर बौद्धिक, मानसिक, शारीरिक, भावनिक, आत्मिक, सामाजिक, राजकीय व आर्थिक अशा सर्व अंगांचा विकास. विद्यार्थ्याचा सर्वांगिण विकास हेच शिक्षणाचे मूळ उद्दिष्ट आहे. या उद्दिष्टाशी



विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि शासन यांना प्रामाणिक राहून कार्य करणे आवश्यक आहे. परंतु वास्तवात भारतीय शिक्षणव्यवस्था या उद्दिष्टापासून अद्याप बरीच दूर आहे, हीच खरी चिंतेची बाब आहे.

### विद्यार्थ्यांसमोरील मुख्य समस्या

१) अभ्यासक्रम जीवनाभिमुख व व्यावहारिक असावा. आजचे शिक्षण बहुधा फक्त सैद्धांतिक राहिले आहे.
२) ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या गरजांचा समतोल विचार करूनच अभ्यासक्रम ठरवला जावा.
३) 'काय शिकावे?' याबरोबरच 'कसे शिकावे?' हे शिकवणे तितकेच महत्त्वाचे आहे.
४) स्व–अभ्यास तंत्र, वाचनाची सवय, आणि संदर्भ ग्रंथांचा वापर यावर भर असावा.
५) शाळा व कॉलेजच्या वेळा विद्यार्थ्यांच्या मानसिक व शारीरिक क्षमतेनुसार असाव्यात. दीर्घ तासांचे वेळापत्रक बौद्धिक ताण वाढवते.
६) पुस्तके व शैक्षणिक साधने परवडणाऱ्या दरात सर्वत्र उपलब्ध असावीत.
७) शाळांमध्ये पिण्याचे पाणी, स्वच्छता गृह, मध्यान्ह भोजनगृह अशा आवश्यक सुविधा असाव्यात. भोजन सकस, ताजे व स्वच्छ असावे.
८) दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी शाळांमध्ये 'फाईल सिस्टम' पद्धत राबवावी – म्हणजेच केवळ आवश्यक विषयांची पुस्तके व काही फुलस्केप कागदच शाळेत न्यावेत.
९) परगावाहून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह व सुरक्षित निवासव्यवस्था असावी.
१०) मुलींच्या शिक्षणाबरोबर त्यांच्या सुरक्षिततेसाठी ठोस उपाययोजना गरजेच्या आहेत.

विद्यार्थ्यांच्या सर्व टप्प्यांतील समस्या ओळखून त्यांचे निराकरण करणे ही जबाबदारी शासन, शिक्षण क्षेत्र, पालक आणि विद्यार्थ्यांचीही आहे. हे काम प्रामाणिकपणे केल्यासच भारतीय शिक्षण खऱ्या अर्थाने यशस्वी ठरेल.

महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना या विद्यार्थी दिनानिमित्त विनम्र अभिवादन.

# देशामध्ये निवडणूक आयोगाची स्वतंत्र यंत्रणा आवश्यक : पत्रकार डॉ. सतीश महामुनी

बीड : प्रतिनिधी



देशभरामध्ये सतत होणाऱ्या निवडणुका आणि लोकसंख्या याचे गांभीर्य लक्षात घेऊन निवडणूक आयोगाची गावपातळीपासून देशपातळीपर्यंत स्वतंत्र यंत्रणा निर्माण करावी अशी मागणी तुळजापूर येथील पत्रकार डॉक्टर सतीश महामुनी यांनी राष्ट्रपती मा. द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

140 कोटी लोकसंख्या असणाऱ्या देशांमध्ये पोलीस खाते, महसूल खाते, बँकिंग व्यवस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, यांच्याप्रमाणे स्वतंत्र निवडणूक आयोगाची यंत्रणा निर्माण करण्यात यावी. भारतासारख्या प्रचंड मोठी लोकसंख्या असणारे देशांमध्ये दररोजची जन्म आणि मृत्यूची संख्या लक्षात घेता निवडणूक आयोगाचे काम बारकाईने आणि बिनचूकपणे होण्याच्या अनुषंगाने स्वतंत्र यंत्रणा असणे अत्यंत गरजेचे आहे. देशाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये सतत निवडणुका सुरू असतात लोकशाहीच्या संकेतानुसार निवडणुका निर्विघ्न आणि बिनचूक होण्यासाठी स्वतंत्र यंत्रणेची अत्यंत आवश्यकता आहे. गेल्या अनेक वर्षापासून निवडणूक आयोग महसूल विभाग शिक्षण विभाग आणि राज्य सरकारच्या वेगवेगळ्या खात्यांचा आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांचा उपयोग करून निवडणुका घेण्याचे काम करते. याशिवाय मतदाराची नोंदणी करण्यासाठी सरकारी कर्मचाऱ्यांनाच घरोघर पाठवून मतदान नोंदणी आणि इतर सर्व कामे करावी लागतात. यामध्ये एका बाजूला सदोष निवडणूक आयोगाची कार्यप्रणाली समोर आली आहे. डबल आणि अनेक वेळा नावाची नोंदणी होणे, पत्ता बदलल्यानंतर दोन्ही ठिकाणी मतदारांची नोंदणी राहणे, फोटो आणि इतर आवश्यक अपुरी माहिती मतदार यादी मध्ये असणे, मतदार यादीतून नाव बाहेर काढण्यासाठी अपुरी व्यवस्था असणे, मृत्यू पावलेल्या लोकांची नावे यादीमध्ये कायम राहणे या आणि अशा विविध कारणांनी निवडणूक आयोगाच्या मतदार याद्या दोषपूर्ण राहतात. या अत्यंत महत्त्वाच्या कामासाठी तात्पुरता कर्मचारी वर्ग घेऊन निवडणूक आयोग कामकाज करतो हे अत्यंत चुकीचे आहे.

केंद्रातील प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सरकारने 2014 पासून अत्यंत क्रांतिकारक आणि लोकहितकारक निर्णय घेतलेले आहेत त्याचा परिणाम आज देशांमध्ये स्पष्टपणे दिसतो आहे जगाच्या पातळीवर भारताची निर्माण झालेली प्रतिष्ठा या सरकारची फलश्रुती आहे सर्व क्षेत्रात काम केल्यानंतर या सरकारने विशेष स्थान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी निवडणूक आयोगाची स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी विशेष लक्ष द्यावे ही विनंती या निवेदनाच्या द्वारे केली जात आहे. निवडणूक आयोगासारखे महत्त्वाचे काम करण्यासाठी महसूल खात्याप्रमाणे गावपातळीपासून निवडणूक आयोग कर्मचारी, तालुका आणि जिल्हा स्थानी निवडणूक आयोगाचे कार्यालय व कर्मचारी, विभाग आणि राज्यपातळीवर आयुक्त आणि संचालक दर्जाचे कार्यालय, राज्य आणि देशपातळीवर आज काम करत असलेले निवडणूक आयोगाचे कार्यालय आणि अधिकारी अशी निवडणूक आयोगाची स्वतंत्र रचना असली पाहिजे आणि ती कायमस्वरूपी इतर सर्व खात्याप्रमाणे शंभर टक्के अनुदानावर असली पाहिजे. त्याशिवाय जन्ममृत्यूच्या नोंदी आणि मतदार याद्या अद्यावत होणार नाहीत. देशाच्या लोकशाहीसाठी आणि प्रगतीसाठी निवडणूक आयोग सक्षम आणि कार्यक्षम असणे अत्यंत गरजेचे आहे याकडे मेहरबान राष्ट्रपती महोदय आणि मेहरबान पंतप्रधान महोदय यांनी जाणीवपूर्वक लक्ष देऊन निवडणूक आयोगाची स्वतंत्र रचना आणि कार्यालय कार्यान्वित करावेत अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात येत आहे. आपण या मागणीचा सहानुभूतीने विचार करून योग्य तो निर्णय घ्याल अशी अपेक्षा पत्रकार डॉ. सतीश महामुनी यांनी निवेदनामध्ये व्यक्त केली आहे.

## सदैव सर्वसामान्य जनतेच्या सेवेत असणारा युवा कार्यकर्ता

# संतोष खंदारे मारणार यळंब घाट गणात पंचायत समितीच मैदान!!

### सर्वसामान्य जनतेला सोबत घेऊन पुर्ण ताकदीने पंचायत समिती निवडणूक लढणार!



बीड : समाजातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन समाजकार्य करणारे युवा नेते म्हणुन संतोष भैय्या खंदारे यांची परिसरात ओळख, कारेगव्हाण ग्रामपंचायत चे विद्यमान सदस्य आहेत व ते महाराष्ट्रातील सर्वात तरुण ग्रामपंचायत सदस्य आहेत, अनेक वर्षांपासून गोरगरीब आणि वंचित जनतेसाठी अहोरात्र झटणारा युवा नेता म्हणुन आपली एक वेगळी ओळख त्यांनी निर्माण केली आहे, कोरोना सारख्या महामारीच्या वेळी एकही दिवस घरी न जाता रुग्णालयात जाऊन व प्रत्येक सर्वसामान्य जनतेत जाऊन आपल्या जिवाची पर्वा न करता काम करत राहिले पिडित रुग्णांची सेवा केली, गावा–गावांत जाऊन विविध कोव्हिड तपासणी कॅम्प घेतले अनेकांचे जीवन वाचवले, ते सतत गोरगरीब, वंचित, विद्यार्थी, शेतकरी, ऊसतोड कामगार, व कष्टर्यांवर झालेल्या अन्याया विरुद्ध लढा असो किंवा त्यांच्या समस्या व अडचणी साठी प्रशासन दरबारी पाठपुरावा असो, संतोष भैय्या खंदारे यांनी नेहमीच लोकांचा विश्वास संपादन केला आहे.

दरवर्षी मोफत महा–आरोग्य तपासणी शिबीर व शस्त्रक्रिया शिबिर घेऊन अनेक गरजुंना त्यांनी मदतीचा हात देण्याचे काम त्यांनी केले, आरोग्य शिबीरांच्या माध्यमातून अनेक गरीब व गरजू रुग्णांच्या शस्त्रक्रिया त्यांनी मोफत करुन दिल्या आहेत, स्व.मुंढे साहेबांनी दाखविलेला लोकसेवेचा मार्ग हा प्रेरणास्रोत मानत संतोष भैय्या खंदारे हे सर्वसामान्य जनतेच्या घराघरात पोहोचले आणि जनतेच्या मनामनात वेगळे स्थान निर्माण केले, न्याय आणि हक्कासाठी ते नेहमीच आघाडीवर असतात, विद्यार्थी, शेतकरी, ऊसतोड कामगार, यांच्या न्याय हक्कासाठी त्यांनी अनेक आंदोलने केली, एक उच्च शिक्षित, व अभ्यासु नेतृत्व म्हणून त्यांच्या कडे पाहिले जाते, संतोष भैय्या खंदारे यांच्या सातत्यपूर्ण समाजकारणामुळे आगामी पंचायत समिती निवडणुकीत यळंब घाट गणात त्यांच्या उमेदवारीची चर्चा जोरात सुरू आहे,

जनतेत त्यांच्या व्यक्तिमत्त्वाताविषयी विश्वास आणि आदराचे स्थान आणि वातावरण असुन त्यांच नाव सर्वदूर चर्चेत आहे.

गोरगरीब, शेतकरी, ऊसतोड कामगार आणि वंचित, व सर्वसामान्य जनतेशी नाळ जुळवुन कार्य करणारा, स्वच्छ प्रतिमेचा, प्रामाणिक व संघर्षशील युवा नेता म्हणुन संतोष भैय्या खंदारे यांचे व्यक्तिमत्त्व उभे राहिले. त्यामुळे यळंब घाट गणात येणाऱ्या निवडणुकीत त्यांना मोठ्या मतांनी निवडून आणले जाईल, असा विश्वास स्थानिक नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केला असून मुंडे साहेबांच्या विचारातून प्रेरणा घेत समाजसेवा आणि राजकारण यांचा सुंदर संगम सादविणाऱ्या संतोष भैय्या खंदारे यांच्या या समाजाभिमुख कार्यामुळे यळंब घाट परिसरात नव्या नेतृत्वाची नांदी होत असल्याचे सर्वसामान्यांमध्ये बोलले जात आहे.

## कामे करताना गट तट कधीच पाहिला नाही...

● पान १ वरून... विधानसभा मतदारसंघातील नागरिक आणि भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारल्याचे दिसत आहे. याच पार्श्वभूमीवर गोविंदवाडी येथे माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांचा गावकऱ्यांच्या वतीने गावातून सवाद्य मिरवणूक काढून भव्य सत्कार करण्यात आला. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे माजी सभापती युधाजित पंडित, युवा नेते रोहित पंडित, युवा नेते यशराज पंडित, कैलास माने, प्रकाशराव तळेकर, गोविंद जोशी, श्रीमंतराव यादव, मुकुंद बाबर, शिवाजीराव चव्हाण, भाऊसाहेब माखले, बबलू खराडे, सतीश सपकाळ, राजाभाऊ विटकर, शेख अफसर, बापूसाहेब जाधव, पिंटू गर्जे, संतराम निकम, सुंदर नाना तिवारी, पप्पू चौधरी, किशोर हत्ते, किसनराव भुसे, चंद्रसेन जाधव, माऊली गावंडे, परमेश्वर जाधव, निखिल करडे, अविनाश थोरात, गणेश कानगुडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. या सर्वांचे आयोजक राजेश पेजगुडे, बाबा शिंगाडे, महादेव मोरे, कारभारी बिचकुले, दत्ता झणझणे, किशोर वाघमोडे, महादेव शिंगाडे, विठ्ठल पेजगुडे, कृष्णा शेंडगे, सुंदर गायकवाड, साळीग्राम बिचकुले, दामोदर मराठे, तुकाराम नरवडे, बालासाहेब झणझणे, सिद्धेश्वर गायकवाड, मोहन वाघमोडे, भागवत झणझणे आदींनी स्वागत केले. सत्कार सोहळ्यास पंचक्रोशीतील पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## फसवणूक प्रकरणातील आरोपींना...

खोटे दस्तऐवज तयार करून अतिक्रमण केल्याचा आरोप होता. या संदर्भात पोलीस तपास सुरू असताना आरोपींनी अटक होण्याची शक्यता लक्षात घेऊन मा. जिल्हा व सत्र न्यायालयात अँड शेख सद्दाम शेख इस्माईल, अँड आदर्श अरुण जाधव यांच्यामार्फत अटकपूर्व जामीनासाठी अर्ज दाखल करण्यात आला होता.
दि. 05/11/2025 रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान ॲड. आदर्श जाधव व ॲड. सद्दाम शेख यांनी आरोपींच्या वतीने प्रभावी युक्तिवाद मांडत न्यायालयासमोर सर्व बाबी स्पष्ट केल्या. युक्तिवाद ऐकून मा. न्यायालयाने परिस्थितीचा सखोल विचार करून 06/11/2025 रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपींना अटकेपासून संरक्षण देत अटकपूर्व जामीन मंजूर केला.

## केज नगरपंचायतच्या माध्यमातून...

मंजूर निधीमध्ये महाराष्ट्र नगरोत्थान महाबियन जिल्हास्तरीय, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरिक दलित वस्ती सुधार योजना आणि नागरी दलिततेत्तर वस्ती सुधार योजना या महत्त्वाच्या तीन योजनांचा समावेश आहे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना व अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांची लोकसंख्या असलेल्या वस्त्यांमध्ये मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी हा निधी वापरण्यात येणार आहे व शहरातल्या अन्य भागात मूलभूत सुविधा साठी निधीचा वापर करण्यात येणार आहे. त्याचबरोबर शहरातील अनेक ठिकाणचे नाल्या, रस्ते, पिण्याच्या पाण्यासाठी पाईपलाईन, स्वच्छता, शहरातील काही मुख्य रस्ते तर काही जोड रस्त्यांचे कामे पूर्ण झालेले आहेत तर उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत व उर्वरित कामे मंजुरीच्या प्रतिक्षेत आहेत लवकरच केज शहराच्या विकासासाठी आम्ही वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली व सहकार्यांनी शहराच्या विकासासाठी निधी उपलब्ध करणार आहोत असे नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड यांनी बोलताना स्पष्ट केले.


## बाबा देशमाने संपादीत संवाद...

सामाजिक कार्यकर्ते सुरेश माने, उद्योजक सोनाजी बहिर, महाराष्ट्र परिचय केंद्राचे नीलेश देशमुख आदींची उपस्थिती होती.

**कव्हर पेजवर ॲड. राज पाटील**

ज्येष्ठ पत्रकार बाबा देशमाने यांनी संवाद हा वार्षिक दिवाळी अंक अतिशय दर्जेदार प्रसिद्ध केला असून दिवाळी अंकाच्या कव्हर पेजवर सेलिब्रिटी नट हानट्याना प्राधान्य न देता सामाजिक कार्यकर्ते, पर्यावरण प्रेमी ॲड. राज पाटील यांना मानाचे स्थान दिले आहे, ही खरोखरच कौतुकाची बाब आहे, अशा शब्दांत संचालक हेमराज बागूल यांनी संवाद अंकाचे आणि सर्व टीमचे कौतुक केले.

# गोळवलकरांच्या पुस्तकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान; सर्वत्र संताप






**बीड :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक माधव सदाशिव गोळवलकर यांनी त्यांच्या 'राष्ट्र' या पुस्तकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी विष ओकले असून त्यांनी केलेल्या उल्लेखाचा आम्ही जाहीर निषेध करतो असेही प्रसिपत्राकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर ट्रेनिंग स्कूल फॉर एंट्रन्स टू पॉलिटिक्स, बीडचे संचालक सिद्धार्थ शिनगारे यांनी म्हंटले आहे प्रसिद्धीपत्रकात पुढे सिद्धार्थ शिंगारे यांनी म्हटले आहे की, या पुस्तकातील 'हिंदू क्यू' या अध्यायात गोळवलकर लिहितात, "पुणे के निकट एक विजय स्तंभ है, जिसे अंग्रेजों ने पेशवाओं पर अपनी विजय के स्मृति स्वरूप बनवाया था। एक प्रमुख हरिजन नेता ने एक बार इसी स्तंभ के नीचे अपने जाति बंधुओ को संबोधित किया। उसने घोषणा की कि यह ब्राह्मणों पर उनकी विजय का प्रतीक है, क्योंकि उन्होंने ही अंग्रेज की अधीनता में लड़कर ब्राह्मण पेशवाओं को परास्त किया था। एक प्रमुख नेता के मुख से गुलामी के इस चिन्ह को विजय का प्रतीक कहा जाना एवं अपने ही बंधुओ से विदेशियों के दास के रूप में युद्ध को एक महान कर्तव्य के रूप में वर्णन करना कितना हृदयद्रावक है। घृणा के वशीभूत होकर वह कितना अंधा हो गया होगा, वह एक सामान्य सत्य भी देख नहीं पाया, विजयी कौन हुए और कौन पराजित! कितनी विकृति है!" या विधानातून गोळवलकरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना 'विकृती' म्हटले, बाबासाहेबांना 'आंधळा' म्हटले, त्यांच्या विचारांना 'घृणास्पद' ठरवले, आणि त्यांना 'सत्य न कळणारा' म्हणून अपमान केला! डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आदर्शांवर आणि त्यांच्या ऐतिहासिक सत्यावर हल्ला करणारा हा गोळवलकर म्हणजे भारतीय समाजातील विषारी विचारसरणीचा प्रतीक आहे. तो मेला असला तरी, त्याच्या विचारांच विष आजही RSS च्या रूपाने समाजात पसरत आहे, असे प्रसिद्धी पत्रकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर ट्रेनिंग स्कूल फॉर एंट्रन्स टू पॉलिटिक्स, बीडचे संचालक सिद्धार्थ शिनगारे यांनी म्हंटले आहे. या प्रकरणी सर्वत्र संताप व्यक्त होत आहे.

## पैठण वकील संघाच्यावतीने खा. संदिपान भुमरेसह आ. विलास भुमरे यांचा सत्कार

पैठण : सर्जेराव खडसन




राज्याचे मुख्यमंत्रीदेवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत दि. (४) रोजी मंत्रालयात झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत पैठण येथे दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) न्यायालयास मंजुरी देऊनत्यासाठी लागणाऱ्या आवश्यक न्यायिक अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांच्या पद निर्मितीस मान्यता देण्यात आली असल्याने वकिली क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व वकील बांधवांसाठी तसेच तालुक्यातील जनतेसाठी त्यांच्या हातुन अत्यंत महत्त्वाचे काम झालेले आहे. पैठण येथे दिवाणी न्यायालय व्हावे यासाठी छत्रपती संभाजी नगर जिल्ह्याचे खासदार संदीपान भुमरे तसेच पैठणचे आमदार विलास भुमरे यांनी वेळोवेळी वरिष्ठ स्तरावर केलेल्या पाठ पुराव्यास व अथक प्रयत्नास अखेर यश मिळाल्याने येथे दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) न्यायालय मंजुर झाले. यामुळे तालुक्यातील जनतेस न्याय प्रक्रियेमध्ये यथा योग्य न्यायदान देण्याचे काम येथील न्यायालयातच मिळणार आहे. हे सर्व फलीत छत्रपती संभाजी नगरचे खा. संदीपान भुमरे व पैठणचे आ. विलास भुमरे यांच्या अथक परिश्रमाने मिळाले असल्याने पैठण वकील संघाचे अध्यक्ष ॲड. संदीप जाधव, सचिव ॲड. सुभाष बाबुराव खडसन, उपाध्यक्ष, ॲड. वैभव चव्हाण, सहसचिव ॲड. इमरान शेख, कोषाध्यक्ष ॲड. स्वप्निल उगले ग्रंथपाल ॲड. उद्धव नजन, सदस्य ॲड. संदीप नाडे, ॲड. रमेश गव्हाणे, तसेच ॲड. शकील बागवान, ॲड. प्रवीण निवारे, ॲड. पांडुरंग वाकडे, ॲड. दादासाहेब दसपुते, ॲड. राहुल धायकर यांच्यावतीने करण्यात आला.

### एकुरका गावातील घटना; बौध्द कुटुंब झाले भयभीत!

### मारहाण करणाऱ्या चौघांविरुद्ध केज पोलिसांत ॲट्रॉसिटी ॲक्ट नुसार गुन्हा दाखल!

# चार जणांनी बौध्द मुलाला बेदम मारहाण करून जिवे मारण्याची दिली धमकी!

केज : प्रतिनिधी

आमच्या मुलीला मोबाईल वरून मेसेज का केलास या आरोपावरून एकुरका गावातील एका बौध्द मुलाला गावातील चौघांनी घरातुन उचलुन रानात नेहुन जबर मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने हे बौध्द कुटुंब भयभीत झाले असुन मारहाण करणाऱ्यांवर केज पोलिसांत ॲट्रॉसिटी ॲक्ट नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या बाबत अधिक माहिती अशी की, केज तालुक्यातील एकुरका गावातील उमेश अशोक कोकाटे वय १७ वर्षे या बौध्द मुलाला गावातील चार जणांनी जबरदस्तीने उचलीत नेहुन जबर मारहाण केली आहे. तर उमेश यास त्याच्या राहात्या घरी बसलेले असताना दि.३ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता सचिन अभिमान मोरे व गणेश तुळशीराम मोरे मोटारसायकलवरून घरी आले व उमेश यास म्हटले की आपल्याला पेंडीचे पोते आणायचे आहे. तु चल असे म्हटले असता उमेश याने त्यांचे सोबत जाण्यास नकार दिल्याने मोटारसायकलवरून आलेल्या सचिन अभिमान मोरे व गणेश तुळशीराम मोरे यांनी त्याला ओढुन गाडीवर बसवून नेमण्याचा प्रयत्न केला. तेवढ्यात उमेशची आई तिथे आली तुम्ही असे का करता म्हणुन त्या दोघांच्या तावडीतुन आपल्या मुलाला सोडण्याचा प्रयत्न करत असताना सचिन मोरे आणि गणेश मोरे या दोघांनी उमेशच्या आईला ढकलून दिल्याने ती खाली पडली तसेच या झटापटीत उमेची आई हिचे झंपर फाटले उमेश ची आई खाली पडल्याचे पाहून सचिन मोरे व गणेश मोरे या दोघांनी उमेश यास सांगितले की तुझे पप्पा आमच्या शेतात आहेत. तिथे एक काम आहे. तु आमच्या सोबत चल असे म्हणून त्याला मोटारसायकल वर टाकून शेतात नेहले. सदरील मोटारसायकल सचिन मोरे चालवत होता. तर गणेश मोरे मागे बसुन उमेश यास दोघांच्या मध्ये घेऊन शेतात नेहले. गाडी थांबताच गाडीवरून खाली उतरत असताना सचिनने पाठिमागुन ढकलल्यामुळे उमेश हा जमिनीवर पडला. त्या दोघांनी उमेश यांस सचिन मोरे यांचे वडील अभिमान मोरे व तुळशीराम




मोरे यांच्या समोर नेहले असता अभिमान मोरे यांनी उमेश यास म्हटले की तू आमच्या पोरीला मेसेज का केलास असे म्हणून उमेश यास मारहाण करण्यात आली. त्यानंतर त्यास माफी मागायला लावुन त्याचा त्यांच्या मोबाईल मध्ये व्हिडिओ शूटिंग करून घेतली. व परत मारहाण करण्यात आली. यावेळी अभिमान मोरे याने धेडग्या, माहरड्या तुझी लायकी आहे का आमच्याशी बोलण्याची अशी जातीयवाचक शिवीगाळ केली. व तु असे पुन्हा केलेल्यास तुला ठार मारुत अशी धमकी दिली. त्यानंतर तुळसीराम मोरे सचिन यांच्या हातातील लोखंडी रॉड घेऊन उमेश याच्या पाठित जबर मारहाण केली. त्यामुळे उमेश खाली जमीनीवर पडला त्यानंतरही न थांबता तुळशीराम मोरे याने उमेश याच्या पोटात लाथा बुक्या आणि चपलाने जबर मारहाण केली. वरील सर्वांनी मिळून उमेश यास लाथा बुक्याने आणि लोखंडी रॉडने जबर मारहाण केल्याने उमेश हा काही काळ बेशुद्ध पडला. यावेळी उमेश यास काही कळत नव्हते. काही वेळानंतर उमेश यांचे वडील अशोक ऊध्दव कोकाटे यांना फोन करून घटनेची माहिती दिली. उमेश यास सचिन अभिमान मोरे, गणेश तुळशीराम मोरे, अभिमान मच्छिंद्र मोरे व तुळशीराम केशव मोरे या चौघांनी उमेश अशोक कोकाटे यास लोखंडी रॉड, चापटाबुक्या, बुटासह चपलाने जबर मारहाण करून जातीवाचक शीवीगाळ करत उमेश यास जिवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी केज पोलिसांत उमेश अशोक कोकाटे यांस जबर मारहाण करणाऱ्या सचिन अभिमान मोरे, गणेश तुळशीराम मोरे, अभिमान मच्छिंद्र मोरे व तुळशीराम केशव मोरे यांचे विरुद्ध केज पोलिसांत ॲट्रॉसिटी ॲक्ट नुसार भा.न्या.सं.(बीएनएस) २०२३ कलम ११५(२), ११८(१), ३५२, ३५१(१) व अनुसूचित जाती जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ ३(२)(r), ३(१)(s) व ३(२)(va) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहायक पोलिस अधीक्षक यांचे मार्गदर्शन खाली केज पोलिस करत आहेत. मात्र या घटनेमुळे एकुरका गावातील कोकाटे कुटुंब भयभीत झाले असुन त्यांच्या जिवितास धोका निर्माण झाला आहे.

सांज दैनिक बीड वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड –४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.
संपादक – जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक – अरविंद ओव्हाळ (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद–विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

# बाळासाहेब राऊत प्रभाग क्र.२५ मधून निवडणुकीच्या रिंगणात

## प्रभागातील विकासकामांसाठी बाळासाहेब राऊत या तरुणालाच निवडून देणार; नागरिकांचा निर्धार

बीड :प्रतिनिधी

काल राज्यातील नगर परिषदा आणि नगर पंचायतींच्या निवडणुकांसाठी तारखा जाहीर झाल्या आहेत. बीडमधील देखील नगर पालिकेची निवडणूक होणार असल्याने वातावरण चांगलेच तापू लागले आहे. बीड शहरातील अनेक प्रभागात इच्छुक उमेदवारांची नावे पुढे येत आहेत. महायुती, महाविकास आघाडी, वंचित बहुजन आघाडी, एम.आय.एम, यासह अनेक पक्षाकडून उमेदवारी अर्ज देण्यात येत असून इच्छुकांकडून या अर्जाची खरेदी केली जात आहे. शहरातील प्रभाग क्रमांक २५ मधील 'अ' ही जागा सर्वसाधारण महिला तर 'ब' ही जागा सर्वसाधारण साठी आरक्षित झाली आहे. या प्रभागात जवळपास ५५०० मतदार आहेत. या भागातून अनेक इच्छुक उमेदवार कामाला लागले आहेत. त्यातील एक नाव म्हणजे बाळासाहेब अंबादास राऊत हे समोर येत आहे. बाळासाहेब राऊत हे प्रभाग क्रमांक २५ मधील 'अ' या जागेवर त्यांच्या मातोश्री यांना निवडणुकीत उभे करणार आहेत.

बाळासाहेब राऊत हे मागील १५ वर्षापासून सामाजिक, राजकीय आणि व्यावसायिक क्षेत्रात काम करत आहेत. अतिशय शांत आणि संयमी असा तरुण स्वच्छ प्रतिमेचा चेहरा म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. बाळासाहेब राऊत हे सर्वसामान्य जनतेत, सर्व समाजात मिळून मिसळून काम करणारे युवा तरुण आहेत. ते प्रत्येकाच्या सुखदु:खात कायमच धाऊन जातात. प्रभागात गणेशोत्सव, नवरात्र महोत्सव, महापुरुषांच्या जयंती यासर्व कार्यक्रमात अग्रेसर



राहून सर्व सण उत्सव पार पाडतात. प्रभाग क्रमांक २५ मध्ये विविध जाती धर्मातील नागरिक राहतात त्या सर्वांसोबत त्यांचे चांगले आणि मैत्रीचे संबंध आहेत. त्यांनी आत्तापर्यंत आपल्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात अनेक सामाजिक उपक्रम राबवून सर्व जातीधर्मातील गोर गरीब लोकांना मदतीचा हात दिला आहे. त्यांनी मागील काळात अनेक नेत्यांच्या नेतृत्वाखाली प्रमाणिक आणि एकनिष्ठ राहून काम केले आहे.

विकासकामे होत नसल्यामुळे त्यांनी नेत्यांची साथ सोडली. त्यांनी कायमच विकासकामांना प्राधान्य दिले. स्वत:च्या फायद्याचा विचार केला नाही. त्यामुळे त्यांनी विकासकामांच्या बाबतीत कधीच तडजोड केली नाही. प्रभागातील विकासकामांसाठी त्यांनी नेहमीच नगरपालिकेत पाठपुरावा केला आहे. त्यांच्या पाठपुराव्यातून प्रभागातील अनेक प्रश्न मार्गी लागले आहेत. त्यांनी स्वच्छता, लाईट, पाइपलाइन यासारखे मूलभूत प्रश्न सोडवले आहेत. स्थानिक नागरिक देखील अडचण आल्यास त्यांच्याकडेच जाऊन आपल्या अडीअडचणी मांडून त्या सोडवून घेतात. त्यामुळे बाळासाहेब राऊत या स्थानिक तरुणानेच आपल्या भागातील नेतृत्व करावे अशी मागणी नागरिकांतून होत आहे. बाळासाहेब राऊत हे कोणत्या पक्षाकडून निवडणूक लढवणार आहेत हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. या तरुण चेहऱ्याला जर संधी दिली तर नक्कीच या प्रभागाचा विकास झाल्याशिवाय राहणार नाही अशी नागरिकांतून चर्चा होत आहे.

---



# कालीका नगरात नाली गेली कुठे ?

## ➤ नागरिकांचा प्रशासनाला लेखी सवाल ➤ गुत्तेदार – अधिकाऱ्यांच्या संगनमताचा आरोप ?

➤माजलगाव : प्रतिनिधी

शहरातील कालीका नगर परिसरात तब्बल दोन वर्षांपासून नालीच गायब झाल्याचा धक्कादायक प्रकार उजेडात आला आहे. घर क्रमांक २१/२२६ गट नं.२४७ येथील रहिवासी विजय वैजनाथराव धुमाळ यांनी उपविभागीय अधिकारी, शहर पोलीस निरीक्षक व नगरपरिषद मुख्याधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करत, नाली मुद्दाम बंद करून त्यावर सिमेंट रस्ता टाकल्याचा गंभीर आरोप केला आहे.

धुमाळ यांच्या म्हणण्यानुसार, सन २०२१ मध्ये संबंधित गुत्तेदाराने तात्कालीन नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांच्या संगनमताने नाली कांक्रीटने बंद केली आणि त्यावर सिमेंट रस्ता ओतला. यामुळे पावसाळा असो वा सामान्य दिवस—घरासमोरील रस्त्यावर कायम घाण पाणी साचत असून, डासांचा उपद्रव, दुर्गंधी आणि डेंग्यू–मलेरियासारख्या आजारांचा धोका प्रचंड वाढला आहे. नागरिकांनी वारंवार तक्रारी केल्या, नगरपरिषद कार्यालय आणि उपविभागीय कार्यालयात अर्ज दिले, तरी दोन वर्षांत एकाही अधिकाऱ्याने जाग न घेतल्याने रहिवाशांत संतापाची लाट आहे. "नालीच कुठे गायब झाली ? कोणी बंद केली ? आणि जबाबदारी कोणाची ?" असे सवाल परिसरातील नागरिक करत आहेत.

धुमाळ यांनी दिलेल्या तक्रारीत स्पष्ट मागणी करण्यात आली आहे की २०२१ मध्ये रस्ता बनवणाऱ्या गुत्तेदारावर कठोर कार्यवाही करावी बंद केलेली नाली शोधून पुन्हा पूर्ववत करावी रहिवाशांना होणारा आरोग्यधोका तातडीने दूर करावानगरपरिषद व पोलिस प्रशासन काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे. नाली गायब करण्यामागे नेमका घोटाळा आहे का ? पुढील कारवाईनंतरच वास्तव समोर येणार आहे.

---

## माजलगावतील कारखान्याने ऊस दर जाहीर करावेत

# हजारो शेतकरी रस्त्यावर भव्य रास्ता रोको

### ➤ प्रशासनाकडून लेखी आश्वासन ➤ तर आंदोलन अणखीन तीव्र करू ➤ युवा संघर्ष समितीचा इशारा

➤माजलगाव / प्रतिनिधी : माजलगाव मतदारसंघातील साखर कारखान्यांनी यंदाचा ऊस दर तात्काळ जाहीर करावा या मागणीसाठी आज माजलगाव शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौकात युवा शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने भव्य आणि शांततापूर्ण रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

शेतकऱ्यांचा ऊस बांधून सहभाग या आंदोलनात माजलगाव, वडवणी आणि धारूर तालुक्यातील हजारो ऊस उत्पादक शेतकरी सहभागी झाले.

शेतकऱ्यांनी स्वत:च्या चारचाकी आणि दुचाकी वाहनांना ऊस बांधून प्रतीकात्मक पद्धतीने शासन आणि कारखानदारांचे लक्ष वेधले.

रास्ता रोकोदरम्यान गेवराई माजलगाव धारूर मार्गांवर तब्बल सहा किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

### विविध संघटना आणि पक्षांचा सहभाग:

या आंदोलनात युवा शेतकरी संघर्ष समितीच्या बॅनरखाली अखिल भारतीय किसान सभा, शेतकरी कामगार पक्ष, रघुनाथदादा पाटील आणि शरद जोशी यांच्या शेतकरी संघटना, स्वाभिमानी शेतकरी संघटना, DYFI युवक संघटना, संभाजी ब्रिगेड, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट), प्रहार जनशक्ती, आझाद क्रांती सेना, भारतीय जनता पार्टी आदी पक्ष–संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.





### प्रशासनाशी चर्चा आणि लेखी आश्वासन

● रास्ता रोको तब्बल साडेतीन तास चालला, दुपारी एक वाजता प्रशासनाचे अधिकारी घटनास्थळी आले आणि पोलिसांच्या मध्यस्थीने आंदोलकांशी चर्चा झाली. आंदोलक ऊस दर तत्काळ जाहीर करा या मागणीवर ठाम राहिले.

● अखेर चर्चेच्या अनेक फेऱ्यांनंतर उपविभागीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी गोरख इंगोले यांच्या अध्यक्षतेखाली १४ नोव्हेंबर रोजी शेतकरी आणि कारखानदार यांच्यात खुली बैठक आयोजित केली जाईल, असे प्रशासनाकडून लेखी आश्वासन देण्यात आले. नगरपालिका निवडणुकांच्या आचारसंहितेमुळे बैठक माजलगावच्या कार्यक्षेत्राबाहेर घेण्यात येणार आहे.

### समितीची भूमिका आणि पुढील पावले

● युवा शेतकरी संघर्ष समितीने सांगितलं की,४ नोव्हेंबर रोजी विविध कारखान्यांना देण्यात आलेल्या निवेदनाला केवळ लोकनेते सुंदरराव सहकारी साखर कारखान्याने उत्तर दिलं, मात्र त्यात ऊस दरवाढीबाबत कोणतेही स्पष्ट भाष्य करण्यात आलेले नाही. त्यामुळे समिती त्या उत्तरावर समाधानी नसल्याचं जाहीर केलं. जर १४ नोव्हेंबरच्या बैठकीत तोडगा निघाला नाही, तर समितीने आंदोलन अधिक व्यापक आणि तीव्र करण्याचे संकेत दिले आहेत. काही सूत्रांच्या माहितीनुसार, भूमिगत आंदोलनाच्या नव्या पद्धतीही युवा शेतकरी संघर्ष समितीतर्फे अवलंबल्या जाऊ शकतात.

### ऊसाचं राजकारण, अर्थकारण आणि समान दराची मागणी

● आंदोलनादरम्यान शेतकरी नेते आणि शेतकरी पुत्रांनी "पश्चिम महाराष्ट्रासारखा दर मराठवाड्यात मिळायलाच हवा" अशी भूमिका मांडली. ● ऊस दर, ऊसाचं राजकारण, अर्थकारण, आणि शेतकऱ्यांच्या घामाच्या दामाच्या हक्कावर झालेल्या अन्यायावर तीव्र भाष्य करण्यात आलं.

### डिजिटल जनजागृती आणि शेतकरी एकता :

● या आंदोलनाच्या पूर्वसंध्येला सोशल मीडियावर ऊस दर जाहीर करा या हॅशटॅगखाली मोठी जनजागृती मोहीम राबवण्यात आली. शेकडो गावांतील तरुण शेतकऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने प्रचार करून शेतकऱ्यांमध्ये आंदोलनाचं वातावरण निर्माण केलं.

---

# शालेय जीवनात शिक्षण घेताना ढेपाळलेली आर्थिक परिस्थितीत कष्ट करत अभ्यास केला

➤माजलगाव / अरविंद ओव्हाळ :

शालेय शिक्षण घेताना वडिलांचे निधन झाले, दोन बहिणींचे शिक्षण व लग्न आईने ढेपाळलेल्या आर्थिक परिस्थितीत नियोजन करून पार पाडले, ही परिस्थिती सुधारण्याचा ध्यास मनी बाळगत माजलगावच्या शिंदेवाडी येथील विलासने अपार कष्ट करून सनदी लेखापाल परीक्षेत यश मिळवले.

आज तो आर्थिक परिस्थितीचे जनमाणसाचे नियोजन करणार आहे.

जीवन जगताना पैसा महत्त्वाचा असतो, तो प्रत्येकाच्या जवळ असेल असे काही नाही, पैशांचे नियोजन लावून जीवनमान चालवणारी व्यक्ती म्हणजे सनदी लेखापाल. सनदी लेखापाल म्हणजे असा एक व्यावसायिक जो लेखा, लेखापरीक्षण, कर आकारणी आणि आर्थिक व्यवस्थापन यामध्ये उच्च स्तरावर प्रवीण आहे. हे शिक्षण घेणाऱ्या व्यक्तीला असाधारण अभ्यासाला व परीक्षेला सामोरे जावे लागते, माजलगाव तालुक्यातील शिंदेवाडी च्या अल्पभूधारक शेतकऱ्याचा विलास माणिकराव माने हा मुलगा, शालेय शिक्षण घेत असताना वडील माणिकराव माने यांचे दुर्दैवी निधन झाले, शोभा व ज्ञानेश्वरी या दोन बहिणींचे शिक्षण व लग्न विलास ची आई अश्वीनी यांनी कसेबसे पार पाडले. विलासला शिक्षण घेताना अपुऱ्या आर्थिक परिस्थितीमुळे काम करावे लागले. ते करत करत संभाजीनगर येथे त्याने सनदी लेखापाल होण्यासाठी अपार अभ्यास केला. सोमवारी लागलेल्या निकालात विलास उत्तीर्ण झाला आणि ज्या ढेपाळलेल्या आर्थिक परिस्थितीचे दैवाने नियोजन करत करत शिक्षण घेण्यास पार पाडले तो विलास आज जन माणसाचे आर्थिक उलाढाल यांचे नियोजन करणार आहे. हे करत असताना आपल्या गाव व पंचक्रोशीतील व्यवसायिकांची मला आर्थिक सुबकता कशी वाढवता येईल याचे नियोजन करता येणार असल्याचा आनंद असल्याचे विलास माने सांगतो.

### भविष्यात माझ्याकडून जनसेवेची कामे होणार याचे समाधान आहे



बालपणापासून पैसा जगायला कसा महत्त्वाचा असतो हे अनुभवले, आईला शेत मजुरीतून आठवड्याला मिळणाऱ्या पैशाचे नियोजन करताना तिची होणारी वाताहात पहिली. याच कारणाने बारावी नंतर सनदी लेखापाल होण्याचे स्वप्न निर्धारपूर्वक पूर्ण केले याचा आनंद होत आहे. आता लोकांच्या पैशांचे व व्यवहाराचे नियोजन मी लावणार आहे भविष्यात माझ्याकडून जनसेवेची कामे होणार याचे समाधान आहे.

– विलास माने

---

# अबब....गंगापूर ते कायगाव या सात किलोमीटरच्या रस्त्यात 1760 खड्डे!

## शहराजवळ एक खड्डा 40 फूट रुंद तर 2 फूट खोलीचा तर 6 खड्डे 15 फूट रुंद व 20 फूट लांबीचे!

गंगापूर :प्रतिनिधी

गंगापूर ते कायगावला जोडणाऱ्या 7 किलोमीटरच्या रस्त्यात तब्बल 1760 खड्डे असून सर्वच्या सर्व खड्डे दैनिक वास्तवच्या प्रतिनिधिने प्रत्यक्ष मोजून काढले असून लांबी आणि रुंदीही मोजून काढली आहे मात्र सध्या गंगपूर नगरपालिकेच्या निवडणुकीचा बिगुल वाजल्याने सत्तेतील व विरोधी पक्षातील लोकप्रतिनिधी रस्त्याची चाकोरी सोडून सत्तेच्या सारिपाटात गुंग आहे तर जनता निवडणुकीत कोणता उमेदवार किती पैसे वाटिल या निष्फळ चर्चेत व्यस्त आहे मात्र अनेक निष्पाप जीवांचे बळी घेणाऱ्या कायगाव देवगाव रस्त्यावर पडलेल्या खड्ड्याबाबत बोलायला कोणी तयार नाही त्यात सामाजिक बांधकाम विभागाचे अधिकारी तर गेंड्याचे काताडे असलेले अधिकारी असून त्यांच्यावर लोकप्रतिनिधिचे लक्ष नाही मात्र तरीही लोकप्रतिनिधिनी सदसदविवेक बुद्धी जागी ठेऊन नवीन रस्ता होईपर्यंत या खड्ड्याची डागडुजी करावी अशी मागनीं प्रवाशी वर्गातून होत आहे.





**हाडाच्या डॉक्टरांना सुगीचे दिवस तर प्रवाश्याना जडले हाडांचे आजार !! :** दरम्यान या रस्त्याने दळणवळण असलेल्या प्रवाश्यांणा खड्ड्यामुळे हाडांचे आजार जडल्याने हाडाच्या डॉक्टरांना सुगीचे दिवस आले असून प्रवाश्याना मात्र हाडांचे आजार जडल्याने खिसा रिकामा होत असून आजार जडले आहे तर अनेक निष्पाप जीवांचा बळी या खड्ड्यानी अद्यापपर्यंत घेतले असून आणखी किती जीवांचे बळी घेतल्यावर या रस्त्याच्या डागडुजीला प्रारंभ होईल हे मात्र येणारा काळच सांगेल हे मात्र नक्की.

### कायगाव ते गंगापूर रस्त्यावरील खड्डयात मासे सोडून बेरोजगारांना रोजगार मिळवून देणार!



● कायगाव ते देवगाव रस्त्यावरील खड्डे बाबत आम्ही वारंवार लेखी निवेदने व आंदोलने आत्तापर्यंत केलेले आहे त्यात काट्यापासून ते पीडब्ल्यूडी ऑफिस पर्यंत बँड वाजत गाजत नेऊन अधिकाऱ्यांना केळी भेट दिलेली आहे दुसरे आंदोलन खड्यात बेशरम लागवड करून आंदोलन केलेले आहे तर खड्ड्याजवळ मुंडन करून आंदोलन केलेले आहे तरीही कुंभकर्णी झोपेत असलेल्या सामाजिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना जाग येत नाही त्यामुळे आता या रस्त्यावरील मोठमोठ्या खड्ड्यात मासे सोडून मच्छी पालन व्यवसाय करून बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्याचे आंदोलन लवकरच करणार आहे. **राहुल वानखेडे** (समाजसेवक)

---

# हमीभाव सोयाबीन खरेदी केंद्रे शेतकऱ्यांसाठी की व्यापाऱ्यांसाठी?

### ➤ हमीभाव खरेदीसाठी शेतकऱ्यांकडून नोंदणी सुरू ➤ पण बहुतांश शेतकरी आधीच विक्री करून बसले

बीड :प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाने केंद्र शासनाच्या मंजुरीनंतर २०२४-२५ हंगामासाठी हमीभाव खरेदी योजना सुरू केली असली, तरी प्रत्यक्षात या योजनेचा लाभ शेतकऱ्यांपेक्षा व्यापाऱ्यांनाच अधिक मिळणार का ? असा प्रश्न शेतकऱ्यांच्या मनात निर्माण झाला आहे.

राज्यातील सोयाबीन, उडीद आणि मुग या प्रमुख पिकांच्या हमीभाव खरेदीसाठी शासनाने ३० ऑक्टोबरपासून ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुरू केली असून १५ नोव्हेंबरपासून प्रत्यक्ष खरेदी केंद्रांवर प्रक्रिया सुरू होणार आहे. मात्र जिल्ह्यातील वास्तव वेगळेच आहे — कारण अतिवृष्टी आणि आर्थिक अडचणींमुळे बहुतांश शेतकऱ्यांनी आपला माल आधीच खाजगी व्यापाऱ्यांना विकून टाकला आहे.

**अतिवृष्टीचा फटका आणि विक्रीची घाई**

अतिवृष्टीमुळे सोयाबीन पिकाची उत्पादकता आणि गुणवत्ता दोन्हीवर परिणाम झाला. त्यातच बियाणे, खत, कीटकनाशक या वाढत्या खर्चामुळे शेतकरी आर्थिक कोंडीत सापडले. परिणामी, मिळेल त्या भावात — ₹३५०० ते ₹४१०० प्रति क्विंटल दराने — अनेक शेतकऱ्यांनी सोयाबीन खाजगी व्यापाऱ्यांकडे विकले. शासनाची खरेदी अजून सुरूच झालेली नसल्याने, शेतकरी म्हणतात की — "पोटाची भूक थांबत नाही ; खरेदी केंद्र वेळेवर सुरू झाली असती, तर फायदा झाला असता."

**शेतकऱ्यांसाठी अटींचा पेच**

हमीभाव खरेदीसाठी नोंदणी करताना शेतकऱ्यांना आधार कार्ड, बँक पासबुक, सातबारा उतारा, पीक पेरा नोंद, केवायसी इत्यादी कागदपत्रे सादर करावी लागतात. अनेक शेतकऱ्यांना इंटरनेट सुविधा व तांत्रिक मदत नसल्याने नोंदणी करणे अवघड ठरत आहे. "योजना चांगली आहे, पण वेळेवर अंमलबजावणी आणि साधनांची सोय नसेल, तर ती शेतकऱ्यांपर्यंत कशी पोहोचणार ?" असा प्रश्न अनेकांकडून विचारला जात आहे.


**मात्र प्रत्यक्षात प्रश्न कायम – ही योजना शेतकऱ्यांसाठी की व्यापाऱ्यांसाठी ?**

कारण हमीभाव केंद्रे उघडण्यापूर्वीच बाजारात माल विकला गेला, आणि उर्वरित शेतकरी तांत्रिक अडचणींमुळे नोंदणी करू शकलेले नाहीत. परिणामी या योजनेचा प्रत्यक्ष लाभ किती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचेल याबाबत लिंबागणेश येथील शेतकरी मोहन कोटुळे, अंकुश जाधव, रामचंद्र मुळे, प्रमोद निर्मळ, अनंत आमटे, अशोक खिल्लारे, अंकुश वाणी, साहेबराव ढवळे, आण्णा खिल्लारे, महादेव ढवळे आदींमध्ये संशय निर्माण झाला आहे.



### खरेदी केंद्र उशिरा; व्यापाऱ्यांना फायदा? – डॉ. गणेश ढवळे

शासनाने बीड जिल्ह्यात २३ खरेदी केंद्रे निश्चित केली आहेत. मात्र खरेदी उशिरा सुरू होत असल्याने बाजारात व्यापाऱ्यांनी आधीच कमी भावाने मोठ्या प्रमाणात सोयाबीन खरेदी करून साठवणीस सुरुवात केली आहे. त्यामुळे शासनाने ठरवलेली केंद्रे गोरगरीब शेतकऱ्यांसाठी आहेत की साठवणूक केलेल्या भांडवलदार व्यापाऱ्यांच्या आर्थिक फायद्यासाठी ? असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेश) यांनी उपस्थित केला आहे.



# चौथी-सातवी शिष्यवृत्ती परीक्षेचा अभ्यासक्रम जाहीर

पुणे : प्रतिनिधी
शालेय शिक्षण विभागाने यंदा राज्यातील चौथी, पाचवी, सातवी आणि आठवी या चार इयत्तांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी राज्य परीक्षा परिषदेने चौथी व सातवीच्या परीक्षांचा अधिकृत अभ्यासक्रम जाहीर केला असून, विद्यार्थ्यांना त्यानुसार तयारी करावी लागणार आहे.

पूर्वी शिष्यवृत्ती परीक्षा चौथी व सातवी या इयत्तांसाठी होत होती. मात्र, २०१६–१७ पासून शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (RTE) ती पाचवी व आठवीसाठी लागू करण्यात आली. परंतु या बदलानंतर परीक्षार्थींची संख्या घटल्याचे लक्षात घेऊन, शिक्षण विभागाने पुन्हा चौथी व सातवीच्या परीक्षा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

या वर्षी विशेष बाब म्हणून एकाच वेळी चौथी, पाचवी, सातवी आणि आठवी इयत्तांच्या शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात येतील. शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये या अभ्यासक्रमाबद्दल उत्सुकता होती.

## चौथी आणि सातवीच्या अभ्यासक्रमात खालील विषयांचा समावेश आहे –

गणित, बुद्धिमत्ता चाचणी, प्रथम भाषा (मराठी इ.), इंग्रजी (तृतीय भाषा) ही परीक्षा मराठी, उर्दू, इंग्रजी, हिंदी, गुजराती, तेलुगू आणि कन्नड या माध्यमांतून घेण्यात येणार आहे.

### चौथीचा अभ्यासक्रम:

प्रथम भाषा : आकलन, शब्दसंपत्ती, कार्यात्मक व्याकरण, भाषाविषयक सामान्य ज्ञान.
गणित : संख्याज्ञान, संख्यांवरील क्रिया, मापन, अपूर्णांक, भूमिती, आकृतीबंध, चित्रालेख.
इंग्रजी (तृतीय भाषा) : शब्दसंग्रह, व्याकरण, विरामचिन्हे, चिकित्सक विचार.
बुद्धिमत्ता चाचणी : वर्गीकरण, सहसंबंध, क्रम ओळखणे, आरशातील प्रतिमा, तर्कसंगती, कूटप्रश्न इ.

### सातवीचा अभ्यासक्रम:

प्रथम भाषा : आकलन, शब्दसंपत्ती, व्याकरण, मराठी विषयाशी संबंधित सामान्य ज्ञान.
गणित : संख्याज्ञान, भूमिती, महत्त्वमापन, बीजगणित, सांख्यिकी, व्यावहारिक गणित.
इंग्रजी (तृतीय भाषा) : शब्दसंपदा, सर्जनशील लेखन, व्याकरण, वाचन कौशल्य. बुद्धिमत्ता चाचणी : सहसंबंध, क्रम ओळखणे, तर्कसंगती, जलप्रतिबिंब, सांकेतिक भाषा, आकृतीचे पृथःकरण इ. राज्य परीक्षा परिषद अध्यक्ष नंदकुमार बेडसे यांनी सांगितले की, या अभ्यासक्रमानुसार प्रश्नपत्रिका तयार केल्या जातील. एप्रिल–मेमध्ये परीक्षा, तर जानेवारीत नोंदणी प्रक्रिया सुरू होणार आहे.

# संस्कारक्षम पिढी घडवणे पालकांच्याच हाती - प्रा.तुषार डोडिया

## फ्लाईंग बर्ड्स मध्ये विद्यार्थी पालक मेळावा संपन्न



माजलगाव : प्रतिनिधी
विद्यार्थ्यांचे करियर जरी शाळेत घडत असले तरी आपल्या पाल्याला शिस्त व चांगल्या सवई लावणे पालकांची जबाबदारी असते आपल्या मुलावर फोकस करून त्यांच्याबरोबर संवाद साधने त्याला वेळ देणे, शारीरिकदृष्टया तंदुरुस्त ठेवणे, मुलांना जंक फूड पासून दूर ठेवणे, त्यांच्यात सामाजिक जाणीव निर्माण करणे त्याची शाळेतील उपस्थिती वाढवणे आणि सगळ्यात महत्वाचे म्हणजे मुलांना मोबाईलचा मर्यादित वापर करायला शिकऊन त्यांच्यावरील आवास्तव अपेक्षांचे ओझे कमी करणे या सप्तसूत्री चा अवलंब करून संस्कारक्षम पिढी घडवण्याचे कार्य पालकांच्याच हाती आहे असे विचार शिक्षण तज्ञ प्रा. तुषार डोडिया यांनी व्यक्त केले ते माजलगाव येथील फ्लाईंग बर्ड्स अकॅडमी मधील विद्यार्थी पालक मेळाव्यात बोलत होते कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग चांडक हे होते.
काल दि.५ नोव्हेंबर गुरुनानक जयंती साजरी करून फ्लाईंग बर्ड्स अकॅडमी चा विद्यार्थी पालक मेळावा संपन्न झाला मेळाव्यात पुढे बोलताना प्रा.दोडिया म्हणाले पालकांनी आपल्या पाल्याच्या आवडी निवडी ओळखून त्यांना शिस्तीत वाढवले पाल्य ऐकत नसतील तर वेळ प्रसंगी रागावून समजावून त्यांना योग्य मार्गदर्शन केले तर ही मुलं आचार विचाराने प्रगल्भ बनतील अभ्यासात पुढे राहतील पण त्यासाठी अगोदर पालकांना ही स्वत: मध्ये शिस्त आणावी लागेल, आजची पिढी अत्यंत टॅलेंट असून ती आपल्यातील चुका उणीवा सहज शोधत असते म्हणून आपण ही तेवढेच सतर्क राहून त्यांना घडवले पाहिजे.
यावेळी व्यासपीठावर पालक प्रतिनिधी सौ. रिटा बाहेती चंद्रकांत मोरे दीपाली साखरे व नागरगोजे सर सह प्राचार्या सारिका बजाज संचालक अण्णा साहेब तौर प्रभाकर शेटे शेख अली पटेल विराजमान होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ऐश्वर्या चांडक यांनी केले सूत्रसंचलन काकडे मॅडम बनसोडे मॅडम व मुळे मॅडम यांनी केले सचिन गायकवाड यांनी आभार प्रदर्शन केल्यानंतर मेळाव्याची सांगता झाली.

# जमिनीशी टच असणारा सर्वसामान्यांचा उमेदवार राधाताई तुकाराम येवले

## ➤ शिवसेनेचा उच्चशिक्षित सक्षम उमेदवार ➤ उपनगराध्यक्ष पदाचा अनुभव.

माजलगाव : प्रतिनिधी
येथील नगरपालिकेमध्ये कायम भाजप शिवसेनेच्या बाजूने मतदारांनी कायम कौल दिलेला आहे. तर विधानसभा लोकसभा निवडणुकीत देखील माजलगाव शहरातून भाजप शिवसेनेच्या उमेदवारास मताधिक्य मिळते. होऊ घातलेल्या नगरपालिका निवडणुकीमध्ये शिवसेनेकडून सक्षम उमेदवार म्हणून उपनगराध्यक्ष पदाचा अनुभव असणाऱ्या व जनतेशी कायम संपर्कात असणाऱ्या राधाताई तुकाराम येवले या ओबीसी महिला उमेदवारास थेट जनतेतून नगराध्यक्ष होण्याची संधी मिळणार आहे.

नगरपालिका निवडणुकीचा बिगुल वाजल्यानंतर महायुती व शरदचंद्र पवार पक्ष यांच्याकडून नगराध्यक्ष पदाचा उमेदवार व २६ नगरसेवकांची चाचपणी सुरू आहे. अनेकांनी तर सोशल मीडियाच्या माध्यमातून आपापले प्रभाग निश्चित केले आहेत.

४१ हजार मतदार माजलगाव नगरपालिका निवडणूक मध्ये मतदानाचा हक्क बजावणार आहेत. जातीय समीकरणे शिवसेनेची असलेली शहरांमधील मजबूत पकड भाजपाकडे नसलेले कणखर नेतृत्व आमदार प्रकाश सोळंके यांच्यावर असलेली शहरवासीयांची नाराजी, याचा फायदा शिवसेनेकडून सक्षम उमेदवार असणाऱ्या राधा तुकाराम येवले यांना निश्चितच मिळणार आहे. राधाताई येवले यांनी उपनगराध्यक्षपदी काम करत असताना शहरवासीयांची वीज पाणी रस्ते आधी कामे प्राधान्याने मार्गी लावलेली आहेत उच्चशिक्षित असणाऱ्या राधा येवले सर्वसामान्यांच्या उमेदवार म्हणून शहरवासीय निश्चितच भक्कमपणे साथ आणि समर्थन देतील. तुकाराम येवले यांचा कायम जमिनीशी टच आहे. नगरसेवक असो अथवा नसो कुठलेही पद असो अथवा नसो जनतेच्या कुठल्याही समस्यांचे निराकरण करणे हे मागील २५ वर्षापासून करत आहेत. भाजपा शिवसेना व बहुजन विकास मोर्चा चे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे अशी युती झाल्यास व शिवसेनेला नगराध्यक्ष पदाची संधी मिळाल्यास राधा येवले यांचा विजय निश्चितच होणार असे सर्वसामान्य मतदार आज खुले आम बोलताना दिसत आहेत. विरोधकांकडून कितीही धनदांडगा उमेदवार आला तरी देखील सर्वसामान्य उमेदवार म्हणून माजलगाव शहरवासी निश्चितच ओबीसीच्या महिला उमेदवार राधाताई येवले यांना शिवसेनेच्या नगराध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी देतील व माजलगाव नगरपालिकेवर निश्चितच भगवा फडकेल.



सौ.राधताई तुकाराम येवले




तुकाराम (बापू) येवले

# मराठा संघर्ष योध्दा जरांगे पाटील यांना झेडप्लस सुरक्षा प्रदान करा

## आ. प्रकाश सोळंके यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

माजलगाव : प्रतिनिधी
मराठा संघर्ष योध्दा मनोजदादा जरांगे पाटील यांची सुपारी देवुन हत्या घडवणा–या कटाची वरिष्ठ पातळीवरून चौकशी करून कायदेशिर कारवाई करावी तसेच जरांगे पाटील यांना राज्यशासनाने झेडप्लस सुरक्षा प्रदान करावी अशी मागणी माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांचेकडे पत्राव्दारे दि.६ नोव्हेंबर २०२५ रोजी केली आहे.



दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, मराठा आरक्षण योध्दा मनोजदादा जरांगे पाटील यांची २.५ कोटी रू.ची सुपारी देवुन हत्या घडवण्याचा प्रयतन झाल्याबाबत जालना पोलिस स्टेशन येथे तक्रार दाखल झाली असून संशयीत दोन व्यक्तींना ताब्यात घेण्यात आले आहे. या संदर्भात वृत्तवाहिन्यानी बातम्या देखिल प्रसिध्द केल्या आहेत. त्यामुळे या घटनेचा तिव्र निषेध व्यक्त करत या प्रकरणाची वरिष्ठ पातळीवरून चौकशी करून दोषींविरूध्द कायदेशीर कारवाई करावी व मराठा संघर्ष योध्दा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या जिवीतास धोका निर्माण झाल्याने त्यांना झेडप्लस सुरक्षा प्रदान करावी अशी मागणी माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांचेकडे केली आहे.



# मानवी जीवनात कुसंगत मोठे नुकसान करते - संजय महाराज पाचपोर

माजलगाव : प्रतिनिधी
मानवी जीवनात वावरताना कुसंगत मोठे नुकसान करते, आयुष्याची वातहात करते त्यामुळे मानवाने सुसंगत ठेवण्याचे प्रतिपादन सुप्रसिद्ध रामायणाचार्य, गोभक्त संजय महाराज पाचपोर यांनी केले. दिंद्रुड येथील खोलेश्वर परिवाराच्यावतीने आयोजित श्री रामकथेचे समालोचन पाचपोर महाराजांच्या सुश्राव्य वाणीतून होत आहे. या कथेस दिंद्रुड व पंचक्रोशीतून शेकडो भाविक भक्त कथा श्रावणास उपस्थित आहेत. मंगळवार, दि.४ पासून दिंद्रुड येथील खोलेश्वर विद्यालयात श्रीराम कथेचे आयोजन खोलेश्वर परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे. श्रीराम कथेतील आयोध्या कांड या विषयावर गुरुवारी समालोचन करताना मानवी जीवनातील ज्ञान, त्याग व संगत याविषयी बोलताना संजय महाराजांनी विविध विषयावर हात घालताना मानवी जीवनात ज्ञान ग्रहण करण्यास वयाचे बंधन नाही, तारुण्यातील त्याग हाच जीवनातील सर्वात मोठा त्याग आहे, मंथरेच्या कुसंगतीमुळे कैकयीच्या स्वभावात कसा फरक पडला व सुखाची ज्ञाप्ती दु:खात कशी झाली याबाबत प्रतिपादन केले. जीवन जगताना पुरातन धार्मिक इतिहासाचा मानवी जीवनावर काय परिणाम होतो, यासाठी कुसंगापासून सावध राहण्याचे आवाहन पाचपोर महाराजांनी केले. मानवी जीवनात दु:खामध्ये नाम चिंतन तर सुखामध्ये अधर्म घडत असल्याचे मत संजय महाराजांनी व्यक्त केले. नारायण बाबा संस्थान वांगी चे अध्यक्ष ह भ प एकनाथ बाबा माने यांच्यासह दिंद्रुड व पंचक्रोशीतील हरिभक्त परायण मंडळी, भाविक, खोलेश्वर विद्यालयाची विद्यार्थी कथा श्रवण करण्यासाठी याप्रसंगी उपस्थित होती. या कथेचे आयोजन खोलेश्वर समूहाचे अध्यक्ष दिलीप पारेकर यांनी केले आहे. विद्यार्थ्यांना बाल संस्कार घडावेत या उद्देशाने या कथेचे आयोजन केल्याचे पारेकर सांगितले. दिशाहीन समाजाला दिशा देण्याचे काम संजय महाराज पाचपोर करत असल्याने आनंद असल्याचे मत याप्रसंगी भाविकांना बोलताना हरिभक्त परायण एकनाथ बाबा माने यांनी सांगितले.



# आ. प्रकाशदादा सोळंके यांच्या हस्ते बक्षीस वितरण - अच्युतराव लाटे

## ➤ सार्वजनिक गणेश उत्सव माजलगाव २०२५ चे

माजलगाव : प्रतिनिधी
शहरात २०२५ गणेश उत्सवा निमित्य मा.आ.प्रकाशदादा सोळंके यांनी गणेश मंडळासाठी व ईतर खेळाडू साठी विविध स्पर्धा आयोजित केल्या होत्या त्या स्पर्धाचे बक्षीस वितरणाचा कार्यक्रम दि.९ वार रविवार रोजी सायंकाळी ६ वाजता सुंदरराव सोळंके माजलगाव महाविद्यालयात आयोजित केला आहे. या कार्यक्रमाच्या बक्षीस वितरणासाठी मा.आ.प्रकाशदादा सोळंके, मा.जयसिंग भैया सोळंके, मा. प्रकाशराव आनंदगावकर, तुकाराम येवले (शिवसेना अध्यक्ष), संजय रेदासनी (व्यापारी महासंघ अध्यक्ष) हे बक्षीस वितरण करीता उपस्थित राहणार आहेत तरी सर्व गणेश मंडळानी व स्पर्धेत बक्षीस मिळालेल्या व्यक्तीने हजर रहावे असे अवाहन उत्सव समितीच्या वतीने श्री.अच्युतराव लाटे, श्री. जयदतजी नरवडे, श्री.संभाजीराव शेजुळ, श्री.चंद्रकांतराव शेजुळ यांनी केले आहे.



# दैनिक सोमेश्वर साथी च्या वर्धापन दिनानिमित्त ; समाज रत्न पुरस्काराचे आयोजन

माजलगाव : प्रतिनिधी
दैनिक सोमेश्वर साथीच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून दिला जाणारा "दैनिक सोमेश्वर साथी समाजरत्न पुरस्कार २०२५" या पुरस्कारासाठी शैक्षणिक, सामाजिक, कृषी, कला, पत्रकारिता, क्रीडा साहित्य, उद्योग, सरपंच आदी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना मा. श्री किरण गित्ते साहेब आयएएस सचिव : सार्वजनिक बांधकाम, कुटुंब कल्याण आरोग्य, उद्योग, माहिती तंत्रज्ञान, पर्यटन विभाग त्रिपुरा सरकार, विवेकानंद सोसायटीचे अध्यक्ष सौ.उषाताई किरण गित्ते बीड जिल्हा परिषद अध्यक्षा, सौ.शिवकन्या ताई शिवाजीराव सिरसाट, परळी नगर परिषद माजी सभापती भास्करराव मामा चाटे, अध्यक्ष :जय हनुमान मंदिर ट्रस्ट, सरपंच काशिनाथ भाऊ कातकडे, वैद्यनाथ देवल कमिटी ट्रस्ट मा. सचिव : राजेश देशमुख दयाधर्म सामाजिक प्रतिष्ठान अध्यक्ष :माधव मुंडे, संगीताताई भाऊसाहेब जामगे समाजसेविका, मा.नाना सानप उद्योजक नाशिक, मा मोहन रंगनाथ घुगे उद्योजक गुजरात, आदी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.



पुरस्कार वितरण सोहळा शासकीय विशेष अतिथी विश्रामग्रह शिवाजी महाराज चौक परळी वैजनाथ वार शनिवार दिनांक १५ नोव्हेंबर २०२५ रोजी होणार आहे अशी माहिती कळविण्यात आली आहे.

# वंदे मातरम गीत स्वातंत्र्यलढ्याचे प्रेरणा स्त्रोत - डॉ. सचिन

माजलगाव : प्रतिनिधी
वंदे मातरम गीत स्वातंत्र्यलढ्याचे प्रेरणा स्त्रोत असल्याचे प्रतिपादन अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे देवगिरी प्रांत अध्यक्ष डॉ. सचिन कंदले यांनी केले. सिद्धेश्वर महाविद्यालयात रासेयो विभागाच्या वतीने आयोजित संपूर्ण वंदे मातरम् सार्थशती कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड हे तर हे तर अर्थ समितीचे अध्यक्ष एकनाथ जाधव, प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. शिवशंकर मिटकरी, डॉ. ज्ञानेश्वर गवते, प्रा. अशोक होके उपस्थित होते.




पुढे बोलताना डॉ. सचिन कंदले म्हणाले की, संपूर्ण वंदे मातरम हे गीत भारताच्या अस्मितेचा एक महत्त्वाचा भाग आहे. स्वातंत्र्यलढ्यांची ज्योत धगधगती ठेवण्याचे कार्य प्रत्येक स्वातंत्र्य सैनिकाच्या मनामध्ये या गीताने केले आहे. जब तरुणाई के कंधों पर आजादी पड़ती है, इतिहास वही मुड़ता है जिधर जवानी चलती है. आशा प्रकारची तरुणांमध्ये प्रेरणा जागृत करण्यासाठी वंदे मातरम हे गीत मोलाचे ठरते. या गीताने राष्ट्रीय भावना मनामध्ये निर्माण करण्याचे कार्य केले. अध्यक्षीय समारोपात अभय कोकड म्हणाले की, वंदे मातरम गीताने संपूर्ण भारतीयांच्या मनामनामध्ये जे स्थान निर्माण केलेले आहे ते अद्वितीय असे आहे. प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी म्हणाले की, आजचा दिवस हा विद्यार्थी दिन म्हणून ओळखला जातो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जी वाचन संस्कृती जोपासली ती वाचन संस्कृती पुढे चालू ठेवण्यासाठी आजचा दिवस हा महत्त्वाचा आहे. प्रास्ताविक डॉ. रमेश गटकळ यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.ज्ञानेश्वर गवते यांनी केले. तर आभार प्रा. अशोक होके यांनी मानले.

उपप्राचार्य डॉ. गजानन होंन्ना, डॉ. युवराज मुळ्ये, प्रा. अंकुश साबळे, पर्यवेक्षक प्रा.परमेश्वर खेत्री, कार्यालय अधीक्षक विजय कुलकर्णी तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संगीत शिक्षक चैतन्य आहेर व त्यांच्या सर्व विद्यार्थ्यांनी संपूर्ण वंदे मातरम या गीताचे सादरीकरण केले.

# निखिल मुंडेंनी डॉ.संपदा मुंडे कुटुंबीयांचे सांत्वन करून केली आर्थिक मदत

माजलगाव : प्रतिनिधी
स्वर्गीय डॉ.संपदाताई मुंडें यांच्या आत्महत्या प्रकरणाचा सखोल तपास करून, आत्महत्येस कारणीभूत असलेल्यांवर कडक कारवाई करून त्यांना फासावर लटकावावे. अशी मागणी भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते तथा मा.सरपंच बद्रिनाथ मुंडे यांचे चिरंजीव भाजपचे निखिल मुंडे यांनी करून स्व. डॉ.संपदाताई यांचे कुटुंबीयांचे सांत्वन करून त्या कुटुंबास आर्थिक मदतीचा हात देत माणुसकीचा धर्म निभावला.

वडवणी तालुक्यातील कवडगाव येथील श्रीकृष्ण श्रीपती मुंडे या शेतकरी कुटुंबातील असलेल्या स्व.डॉ.संपदाताई श्रीकृष्ण मुंडे या मुलीने उच्च शिक्षित होऊन स्वकर्तृत्वाने डॉक्टर बनल्या होत्या. त्यांची प्रशासकीय नेमणूक सातारा जिल्ह्यातील फलटण येथील उपजिल्हा रुग्णालयात डॉक्टर म्हणुन करण्यात आलेली होती. डॉ.संपदाताई यांनी पोलीस अधिकारी व इतरांच्या छळास वैतागुन आत्महत्या केल्याची घटना घडली होती. या वाईट घटने मुळे राज्यातून तथा बीड जिल्ह्यातील सर्वस्तरावरून तीव्र प्रतिक्रिया व्यक्त होत असुन, याप्रकरणी आत्महत्येस कारणीभूत असलेल्या




व्यक्तींवर कडक कारवाई करून त्यांना फाशी द्यावी. अशी मागणी करत जिल्ह्यात सर्वत्र संताप व्यक्त करत सर्व स्तरातून निषेध केला जात आहे. यासंदर्भात भाजपचे नेते तथा कोयाळचे मा.सरपंच बद्रिनाथ मुंडे यांचे चिरंजीव निखिल मुंडे यांनी नुकतीच मयत डॉ.संपदाताई मुंडे यांचे वडील श्रीकृष्ण मुंडे व कुटुंबाचे सांत्वन करून या अभाळा एवढ्या दु:खातुन सावरण्यास माणुसकीचा धीर दिला. तसेच याप्रकरणाचा जलद गतीने तपास करून जलद गती न्यायालयात केस दाखल करून, एसआयटी स्थापन करून आरोपींना फासावर लटकावे. अशी मागणी निखिल मुंडे यांनी केली. यावेळी निखिल मुंडे यांनी मयत डॉ.संपदा मुंडे यांच्या परिवारास ५१,००० हजारांची आर्थिक मदत देत माणुसकीचा धर्म निभावला. यावेळी त्यांच्यासमवेत भाजप जेष्ठ नेते शिवाजी आप्पा मुंडे, मा.जि.प.सदस्य लालासाहेब तिडके, सरपंच तुकाराम तिडके, मा.सरपंच सुग्रीव तिडके, बाबासाहेब उर्फ बाबु गुरूजी, हनुमंत मुंडे, रामप्रभु बाबा मुंडे, राधाकिसन तिडके, बालासाहेब तिडके आदिसह अनेकजण उपस्थित होते.